03 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरण साहित्य म्हणजे मानवतेचा खजिना

## जत्ती : शिवाजी विद्यापीठात अध्यासनाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क




शिवाजी विद्यापीठात डॉ. अरविंद जत्ती व डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांनी शरण साहित्य पुस्तकांची टोपली कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजच्या काळातही प्रेरक असून, शरण साहित्य म्हणजे मानवतेचा खजिना आहे, त्यामुळे शिवाजी विद्यापीठात शरण इतिहासाचे नवे सुवर्णपान लिहिले जात आहे, असे गौरवोद्गार बंगळुरूच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांनी शनिवारी येथे काढले.

विद्यापीठात 'शरण साहित्य : संकल्पना आणि प्रासंगिकता' विषयावर ते बोलत होते. बसवकल्याणच्या अनुभव मंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू आणि डॉ. जत्ती यांनी शरण साहित्याची मराठी, हिंदी, इंग्रजी व कन्नड भाषांतील १५ पुस्तकांची टोपली कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करून शरण साहित्य अध्यासनाचे उद्घाटन केले.

**४३**
**भारतीय भाषांमध्ये डिजिटल स्वरूपात बसव वचने उपलब्ध**

डॉ. जत्ती म्हणाले, महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यात राजकीय मतभेद असले तरी ही दोन राज्ये बसवण्णांच्या आध्यात्मिक साहित्याने जोडली जात आहेत. हे बंध अधिक दृढ होतील. ४३ भारतीय भाषांमध्ये डिजिटल स्वरूपात बसव वचने आहेत. विद्यापीठाने वचनांचे रशियन भाषेत अनुवाद करण्यास सहाय्य करावे, अशी अपेक्षा जत्ती यांनी व्यक्त केली.

डॉ. पट्टदेवरू म्हणाले, गणितातील तथ्याप्रमाणे बसवतत्त्वही वैश्विक आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत बसवण्णांसारख्या महामानवाचा अभ्यास करता येणार आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या जूनपासून महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर दोन क्रेडिटचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले जाईल. कर्नाटकच्या विद्यापीठांतील शरण साहित्य अध्यासनांसमवेत सामंजस्य करार केला जाईल. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी परिचय करून दिला. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2025
पुढारी



कोल्हापूर : शरण साहित्य अध्यासन कार्यारंभ कार्यक्रमात बोलताना डॉ. अरविंद जत्ती. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बसवलिंग पट्टदेवरू, डॉ. तृप्ती करेकट्टी आदी.

# शरण साहित्य हा मानवतेचा खजिना

## • डॉ. अरविंद जत्ती; शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचे उद्घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजच्या काळात प्रेरक असून, शरण साहित्य म्हणजे मानवतेचा खजिना आहे. त्यामुळे शरण साहित्य अध्यासनाच्या रूपाने शिवाजी विद्यापीठात शरण इतिहासाचे एक नवे सुवर्णपान लिहिले जात आहे, असे गौरवोद्गार बंगळूरच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचा कार्यारंभ झाला. या निमित्ताने 'शरण साहित्य: संकल्पना व प्रासंगिकता' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जत्ती म्हणाले, १२ व्या शतकापासून ते एकविसावे शतक व येथून पुढेही जगाचे दिग्दर्शन करण्याची क्षमता शरण साहित्यामध्ये आहे. शरण साहित्याला धार्मिक समजणे गैर असून, ते मूलतः आध्यात्मिक आहे, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.

बसवकल्याण अनुभवमंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू म्हणाले, १२ व्या शतकात हजारो शरणांनी प्राणार्पण करून पुरोहितशाही व जातीयवादी प्रवृत्तींपासून शरण साहित्याचे संरक्षण व जतन केले. त्या शरणांच्या बलिदानाचे फलितस्वरूप आज शरण साहित्य अध्यासनाच्या रूपाने साकार होत आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जून २०२५ पासून अध्यासनामार्फत महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर दोन क्रेडिटचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल.

डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य जी. पी. माळी, डी. यू. पवार, सतीश घाळी, सरलाताई पाटील, डॉ. आप्पासाहेब पुजारी, प्राचार्य टी. एस. पाटील, वसंतराव मुळीक, रावसाहेब पुजारी, अॅड. अभिषेक मिठारी, डॉ. अनमोल कोठडिया आदी उपस्थित होते.

03 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरण साहित्य हा मानवतेचा खजिना

## डॉ. अरविंद जत्ती; विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजच्या काळातही प्रेरक असून, शरण साहित्य म्हणजे मानवतेचा खजिना आहे. त्यामुळे शरण साहित्य अध्यासनाच्या रूपाने शिवाजी विद्यापीठात शरण इतिहासाचे एक नवे सुवर्णपान लिहिले जात आहे, असे गौरवोद्गार बेंगळूरच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांनी काढले.**

शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचा कार्यारंभ करण्यात आला. या निमित्ताने 'शरण साहित्य : संकल्पना आणि प्रासंगिकता' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. जत्ती म्हणाले, बाराव्या शतकापासून ते एकविसावे शतक आणि येथून पुढेही जगाचे दिग्दर्शन करण्याची क्षमता शरण साहित्यामध्ये आहे. शरण साहित्याला धार्मिक समजणे गैर असून, ते मूलतः आध्यात्मिक आहे, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र संघाचा मानवाधिकारांचा जाहीरनामा असो की भारताचे संविधान, या दोहोंमध्ये ज्या मानवी मूल्यांचा उच्चार आहे, ते सर्व शरण साहित्यात आहे. आपले वडील भारताचे माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती यांचे पदवीचे शिक्षण कोल्हापुरात झाले, अशी आठवणही यावेळी त्यांनी सांगितली.

बसवकल्याण अनुभव मंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांनीही



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन कार्यारंभ कार्यक्रमात बोलताना डॉ. अरविंद जत्ती.**

आपण शिवाजी विद्यापीठातून एम.ए.ची पदवी घेतल्याचे सांगितले. ते म्हणाले, बसवण्णांचा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक समतेचा विचार हाच फुले, शाहू, आंबेडकरांचाही होता. या खऱ्या बसवतत्त्वांचा प्रसार, प्रचार करण्यासाठी अध्यासन मोलाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा संगम समजून घेऊन अहंभाव संपवण्यासाठी बसवतत्त्वांचा अभ्यास आणि आचरण आवश्यक असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, अधिसभा सदस्य अ‍ॅड. अभिषेक मिठारी यांनी अधिसभेत ठरावाच्या माध्यमातून अध्यासनाचे बीजारोपण केले. त्याला अधिसभेसह व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद या सर्वच अधिकार मंडळांचे समर्थन लाभले. जून २०२५ पासून अध्यासनामार्फत महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर दोन क्रेडिटचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल.

अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राचार्य जी. पी. माळी, डी. यू. पवार, सतीश घाळी, सरलाताई पाटील, डॉ. आप्पासाहेब पुजारी, प्राचार्य टी.एस. पाटील, वसंतराव मुळीक, रावसाहेब पुजारी, यश आंबोळे, डॉ. अनमोल कोठडिया आदी उपस्थित होते.

03 FEB 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीजींकडून मिळालेल्या आत्मबलाचा वापर स्त्रियांनी समाजहितासाठी करावा : बेडकिहाळ

## शिवाजी विद्यापीठात महिलांमधील राजकीय साक्षरतेवर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क




शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या कार्यशाळेत किशोर बेडकिहाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विक्रम जरग, डॉ. आर. जी. पवार, कांचनताई परूळेकर, प्रा. यशोधन बोकील, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

**कोल्हापूर** : स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी अहिंसेचा मार्ग अवलंबताना स्त्रियांमधील आत्मबल जागृत करून त्यांना राष्ट्रीय चळवळीत आणले. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा लढा व्यापक झाला. आजच्या राजकारणामध्ये स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले असून, त्यांनी आपल्या आत्मबलाचा वापर समाजाच्या हिताकरिता करावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित केलेल्या 'महिलांमधील राजकीय साक्षरता' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. स्वयंसिद्धाच्या अध्यक्षा कांचनताई परूळेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. स्त्रिया अबला नसून सबला आहेत. संसदीय सभेत महिलांच्या आरक्षणाकरिता त्यांनी जागरूक झाले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. संचालक डॉ. आर. जी. पवार अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

प्रा. यशोधन बोकील यांनी प्रास्तविक केले. विक्रम जरग यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नेहा वाडेकर, डॉ. सचिन भोसले, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी मार्गदर्शन केले. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले.


03 FEB 2025
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Researchers develop biochar with jamun leaves for sustainable industrial wastewater treatment

Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** Shivaji University researchers have developed an innovative 'biochar' from jamun leaves, capable of adsorbing colour pollutants from industrial wastewater, offering a promising, eco-friendly, cost-effective and commercially viable solution for dye-polluted water treatment and purification.

The majority of biochar is made from plant and animal biomass like residential plant trimmings, food processing residues or forestry cuttings. "The focus of the research was to develop the 'biochar' using sustainable and eco-friendly option like jamun leaves. Biochar is a porous and sponge-like material that adsorbs colour pollutants from wastewater using natural organic components, maximising its purification potential. The use of jamun leaves was looked into as it is biodegradable and did not include use of chemicals," Dr Jyoti Jadhav, senior researcher at Shivaji University's biotechnology department, said. Dr Jadhav collaborated with PhD student Shubham Sutar on the project. She said the university's biotechnology department spent 20 years researching industrial wastewater treatment, focusing on textile dye pollutants. During the course of their research on industrial wastewater treatment and purification, the researchers came up with a new theory, 'Theory of Pore Conflation', and a new equation, 'Shubhjyot Equation'.




Theory of Pore Conflation presented by SUK Researchers

Explaining, Dr Jadhav said using biochar in wastewater treatment offered two significant advantages, cost-effectiveness as it could be produced from waste material and its potential for regeneration and reuse. "We further tried to analyse the increase in adsorption capacity of biochar without limiting it only to this formation. This led to the development of the "Theory of Pore Conflation", which explains how biochar's adsorption capacity increases with temperature. This theory is expected to accelerate research in adsorption science, enabling researchers to enhance the efficiency of various water purification reactors," she said.

Dr Jadhav emphasised that the credit for the research solely belonged to Shivaji University, highlighting that the entire analytical process was conducted utilising the university's scientific instruments, specifically at the central facility centre and various departments, including the department of biotechnology.

Shubham Sutar, her student and co-researcher, said "Shubhjyot's Equation" was a mathematical model that simulated time-dependent adsorption processes, addressing limitations in existing models. "This innovative equation highlights the importance of time-dependent behaviour and its connection to established adsorption models, making it a valuable resource for researchers and engineers developing adsorption-related technologies," Sutar said.

Their research paper, "Theory of Pore Conflation' and 'Shubhjyot's Equation' in the Treatment of Brilliant Green Dye-Contaminated Water Using Jamun Leaves Biochar," was published in 'Biochar', a special journal devoted to adsorption science by 'Springer Nature' recently.

03 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुकमाटी महाकाव्य जगाला प्रेरणा देणारे

## डॉ. व्ही. एन. शिंदे : विद्यासागर महाराज प्रथम समाधी स्मृती महोत्सवास प्रारंभ

जयसिंगपूर, ता. २ : 'मुकमाटी महाकाव्य केवळ जैन समाजालाच नव्हे, तर विश्वाला नवी शिकवण देणारे आहे. यामध्ये जैन तत्त्वज्ञान आणि विज्ञान या दोघांची सांगड घातली आहे. हे सर्वांसाठी निश्चितपणे प्रेरणादायक असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज येथे व्यक्त केले.

संतशिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महामुनिराज यांच्या प्रथम समाधी स्मृती महामहोत्सवाचे उद्घाटन 'मुकमाटी' या महाकाव्यावरील परिसंवाद व चर्चासत्राने झाले. त्यावेळी ते बोलत होते. जयसिंगपूर येथील स्व. शामराव पाटील-यड्रावकर नाट्यगृहात हे चर्चासत्र झाले.

बीजभाषक म्हणून तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. वकील पाराज यांनी महाकाव्याविषयी माहिती दिली. सत्राच्या अध्यक्षस्थानी आशीष शहा होते. पहिल्या सत्रात 'मुकमाटी महाकाव्यातील अध्यात्म' या विषयावर ॲड. रावसाहेब चौगुले, 'मुकमाटी महाकाव्यातील वाङ्मयीन सौंदर्य' या विषयावर प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. महावीर अक्कोळे होते. दुसऱ्या सत्रात 'मुकमाटी महाकाव्यातील समाजवाद' या विषयावर महावीर अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे, तर 'मुकमाटी महाकाव्यातील स्त्री वाद' विषयावर प्रा. शांतिनाथ लगारे यांचे व्याख्यान झाले. दुपारी चार वाजता विशालसागर महाराज यांचे 'मुकमाटी महाकाव्यातील वैश्विक शांतीचा संदेश' या विषयावर प्रवचन झाले. यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, माजी खासदार राजू शेट्टी उपस्थित होते.



जयसिंगपूर : संतशिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महामुनिराज यांच्या प्रथम समाधी स्मृती महामहोत्सवाचे उद्घाटन 'मुकमाटी' या महाकाव्यावरील परिसंवादाने झाले. यावेळी डॉ व्ही. एन. शिंदे, आशीष शहा, डॉ. वकील पाराज, तात्या भैया आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2025
लोकमत

# पत्रकारितेत नाना पालकर यांचे योगदान महत्त्वाचे : ओतारी

## शिवाजी विद्यापीठातर्फे वाहिली आदरांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोल्हापुरातील पत्रकारितेमध्ये नाना पालकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार ओतारी यांनी शनिवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे ज्येष्ठ पत्रकार नाना पालकर यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी 'नाना पालकर यांची पत्रकारिता' या विषयावर ते बोलत होते.

ओतारी म्हणाले, नानांचा पत्रकारितेतील अनुभव ५० वर्षांहून अधिक होता. पत्रकार परिषदेला जाताना पत्रकारांनी गृहपाठ करूनच जावे, असा त्यांचा अट्टाहास होता. पत्रकारांनी घटनेचा, संविधानाचा अभ्यास करावा, असाही त्यांचा आग्रह होता. कोल्हापूरच्या अनेक प्रश्नांसाठी त्यांनी लिखाण केले. त्यांनी दिल्ली येथेही चांगली पत्रकारिता केली. पत्रकारांना पेन्शन मिळावी म्हणून मोठा संघर्ष केला; परंतु त्यांना स्वतःला वंचित राहावे लागले याची खंत वाटते.

समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी शोकप्रस्ताव मांडला. यावेळी महापालिकेचे माजी जनसंपर्क अधिकारी दिलीप मंडलिक, समीर मुन्शीपालकर, अमीर मुन्शीपालकर, तन्वीर मुन्शीपालकर, कबीर मुन्शीपालकर, हमीद मुन्शीपालकर, विशाल ओतारी, डॉ. रत्नाकर पंडित, मिलिंद देसाई, भरत खानोलकर, शीतल बोंगाळे, माहिती अधिकारी वृषाली पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर, मतीन शेख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2025

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचे प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. कांबळे आणि सिध्दार्थ शिंदे यांनी मंत्री नितेश राणे यांची भेट घेउन सागरी पर्यावरण केंद्रासाठी मालवण येथील जागेची मागणी केली.

# शिवाजी विद्यापीठाला मालवणमध्ये सागरी पर्यावरण केंद्रासाठी जागा

## मंत्री नितेश राणे यांचे सकारात्मक पाउल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सागरी पर्यावरण केंद्रासाठी मालवण येथे किमान ५ एकर जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी मत्स्यव्यवसाय आणि बंदर मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली. रोजगार क्षमतेला चालना देण्याची इच्छा व्यक्त करुन राणे यांनी सकारात्मक पाउल उचलत मालवण येथील हे सागरी केंद्र पुढील संशोधनास बळकट करण्यास मदत करेल असा आशावाद व्यक्त केला.

## सागरी केंद्रामुळे हे घडेल

सागरी जीवनातील जैवविविधतेवर हवामान बदलाचा परिणाम
किनारी वनस्पती आणि प्राणी यांचे बीज उगवण तंत्रज्ञान
अन्न तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र
किनारी पर्यावरण आणि विषशास्त्र
धोक्यात आलेल्या वनस्पती आणि जीवजंतूंचे संवर्धन
एकपेशीय वनस्पतींचे फायटो उपाय
किनारी प्रदेशांचा ऐतिहासिक व पर्यटन अभ्यास
उत्पादनांसाठी नॅनो तंत्रज्ञानाचा वापर
किनारपट्टी आणि आर्थिक उन्नतीचे एसडब्लूओटी विश्लेषण.
स्थानिकांसाठी कौशल्य व रोजगार निर्मिती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2025

पुढारी

# विद्यापीठात 'शोध होळकरशाहीचा' विषयावर आज चर्चासत्र



कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या वतीने 'शोध होळकरशाहीचा' या विषयावर ३ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० ते ५ या वेळेत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांचे बीजभाषण होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. चर्चासत्रामध्ये डॉ. देवीदास पोटे, डॉ. प्रभाकर कोळेकर, सुमीतराव लोखंडे, विनिता तेलंग, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. संतोष पिंगळे, डॉ. अवनीश पाटील, रामभाऊ लांडे, डॉ. नीलेश शेळके मार्गदर्शन करणार आहेत.